# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०६/२०२४ (सोमवार) सकाळ**


## अवैध्यरीत्या गाई/बैल गौवंशाची वाहतुक करणाऱ्या आरोपीवर कायदेशिर कार्यवाही

दिनांक १६/०६/२०२४ चे ००/३० वाजता दरम्यान पोलीस निरीक्षक राकेश साखरकर ठाणेदार पोलीस स्टेशन केळवद व त्यांच्या पोलीस स्टॉप नि मुखबिरद्वारे मिळालेल्या खबरे वरुन मध्यप्रदेश येथुन सावळी (मो) मार्गानी केळवद कडे जाणा—या डांबरी रोड वरील स्प्रिंग वेली वॉटर पार्क येथे नाकाबंदी करुन नाकाबंदी दरम्यान लाल रंगाच्या बॅटनचा इशारा करुन नाकाबंदीचे ठिकाणी थांबविण्याचा इशारा केला असता काळया रंगाची कार क्र. एम.एच—०४/डी. डब्ल्यू. —९३२९ चा चालकाने आपले ताब्यातील कार नाकाबंदीचे ठिकाणी न थांबविता केळवद कडे पळु लागला त्याचा सरकारी वाहनाने पाठलाग केला असता काही अंतरावर कार सोडुन कार मधुन दोन आरोपी पळु लागले त्यांचा स्टॅाफ च्या मदतीने पाठलाग केला असता एक इसम मिळुन आला व एक इसम अंधाराचा फायदा घेउन जंगलाच्या दिशेने पळुन गेला. सदर कारची पाहणी केली असता काळया रंगाची कार क्र एम.एच—०४ डी. डब्ल्यू, ९३२९ किंमती ४,००,०००/— रुपये मध्ये १) ५ नग गाई/कालवड गौवंश प्रत्येकी किंमती १५,०००/— रुपये प्रमाने किंमती ७५,०००/— रुपये, २) १ बैल गौवंश किंमती १५,०००/— रुपये असा एकुण ४,९०,०००/— रुपयाचे गाई/बैल गौवंश जनावरांना अत्यंत क्रुर व निर्यदयतेने वाहनात डांबुन आखुड दोरीने पाय व तोंड बांधुन चारा पाण्याची सोय न करता दाटीवाटीने अपु—या जागेत कोंबुन कत्तलीसाठी अवैद्यरित्या वाहतुक करताना मिळुन आल्याने सदरचा मुद्देमाल जप्त करुन सदर गुन्हयातील काळया रंगाची कार क्र एम.एच—०४/डी.डब्ल्यू—९३२९ चा चालक नामे— पाहिजे आरोपी अशफाक शेख रा. कामठी तह. कामठी व शेख इस्राफिल शेख ईस्माईलसा वय ३५ वर्ष रा. कुंभारे कॉलनी, ड्रॅगन पॅलेस जवळ, कामठी तह. कामठी जि. नागपुर याचे विरुद्ध कलम २७९, ३४ भादवी सहकलम ११(१) (घ) (ड) (च) प्राण्यांना निर्देयतेने वागविने प्रतिबंधक अधिनियम—१९६० सहकलम—५ (अ), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ सहकलम ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम सहकलम १८४ मो. वा. का अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. श्री. अनिल मस्के उप विभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राकेश साखरकर ठाणेदार पो.स्टे केळवद, स. फौ. किशोर ठाकरे, पोहवा दिनेश काकडे, नापोशि दीपक इंगळे, पोशि धोंडुतात्या देवकत्ते, चास.फौ. गुणेश्वर डाखोळे यांनी केली आहे.


MH 04 DW 9329



## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

दिनांक १६/०६/२०२४ रोजी पोस्टे अरोली येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध गोवंश वाहतूकीस आळा घालणेकरिता स्टाफसह पेट्रोलिंग करीत असताना मुखबिरद्वारे माहिती मिळाली की, एक पांढऱ्या रंगाची टाटा योद्धा पिकअप गाडी क्र. एम.एच–३६/ए.ए–३११७ मध्ये गोवंश जनावरे भरून कत्तलीकरीता धानोली कडुन निमखेडा मार्गे कामठीकडे घेवुन जात आहे. अशा माहिती वरून स्टाफने मौजा रेवराल गावासमोर नाकाबंदी करून टाटा योद्धा पिकअप गाडी क्र. एम.एच–३६/ए.ए.–३११७ चा चालक आरोपी नामे– शाम शिवप्रसाद मिश्रा, वय २४ वर्ष, रा. जांब तह. मोहाडी जि. भंडारा याला थांबण्याचा इशारा केला असता त्याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व हयगयीने व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा धोकादायक पद्धतीने निमखेडा मार्गे पळु लागला. अरोली पोलीसांनी आरोपीचा वाहनाचा पाठलाग करून पकडले. सदर वाहनाची पाहणी केली असता एम.एच–३६/ए.ए.–३११७ मध्ये ०२ पांढऱ्या रंगाच्या गायी, ०१ काळया रंगाची गाय तसेच ०१ पांढऱ्या रंगाचा बैल असे एकुण ०४ गोवंश अत्यंत निर्दयतेने कोंबून, आखूड दोरखंडाने बांधुन व जनावरांची चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तली करिता घेऊन जातांना मिळून आल्याने आरोपींच्या ताब्यातून एकुण ०४ गोवंश किंमती ८५,०००/–रू. व एम.एच–३६/ए.ए. –३११७ किंमती ५,००,०००/–रू. असा एकुण ५,८५,०००/– चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपी चालक १) शाम शिवप्रसाद मिश्रा, वय २४ वर्ष, रा. जांब तह. मोहाडी जि. भंडारा २) कंडक्टर चंद्रहास शेशराव सेलोकर, वय २७ वर्ष, रा. जांब तह. मोहाडी जि. भंडारा ३) गाडीचा मालक व गोवंश जनावरे जमा करणारा संजय न्याहारचंद पुंड, वय ३७ वर्ष, रा. नवेगाव तह. मोहाडी ४) बिलाल जहीर कुरेशी, रा. कामठी यांचेविरुद्ध कलम २७९, ३३६, १०९ भादंवि. ११(१) (ड) प्रा. छळ. प्रति. का. सहकलम ५A(२), ९ म. प. स. अधि., सहकलम ३ (१)/१८१, १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे अरोली ठाणेदार सपोनि. निशांत फुलेकर, पोउपनि सुशीलकुमार सोनवणे, पोहवा संदीप बाजनघाटे, पोहवा श्याम पोकळे, पोशि मनिश, विकी, रामरतन, शिलन, तिजारे, पोशि देवांगन यांनी केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर